Impact Factor-8.575 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

**Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed**

**Multidisciplinary International Research Journal**

**January-2023**

(CCCLXXXVI ) 386 (D)

## 75th YEARS OF INDIAN INDEPENDENCE




**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
**Dr. Vilas Aghav**
Officiating Principal
Associate Professor & Head
Department of Political Science.
Adarsh Mahavidyalaya, Hingoli Dist. Hingoli

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

One Day InterdisciplinaryNational Conference on

# "75 Years of Indian Independence"

## Editorial Board

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development
Training Institute, Amravati.

**Dr. Vilas Aghav**
Editors ,
Officiating Principal,
Associate Professor & Head
Department of Political Science.
Adarsh Mahavidyalaya, Hingoli Dist. Hingoli

**Mr. Gajanan P. Chavan**

**Mr. Dipak A.Khillare**

**Dr. Akash S. Bangar**

Executive-Editors
Adarsh Mahavidyalaya, Hingoli Dist. Hingoli

## INDEX - D


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Indian Constitution and Human Rights | Dr. Maya S. Watane | 1 |
| 2 | .Indian Democracy and Supreme Court | Dr. Mane Sachin Babruvan | 4 |
| 3 | Human Rights and Literature | Mr. Amit M. Pawar | 9 |
| 4 | Judicial Interpretation of Human rights under Indian Constitution | Miss Sonali Bhagwandas Dad | 11 |
| 5 | Role of Citizens in Democracy | Mr.Ashok Kisan Wakade. | 14 |
| 6 | SAGAR - Comprehension of India's Maritime cooperation policy in IOR | Dr. Satish Karad | 17 |
| 7 | Critical Theory And Truth In Mahatma Phule's Sarvajanik Satya Dharma | Manasi Ahire | 23 |
| 8 | भारत में संविधान द्वारा स्थापित संसदीय शासन प्रणाली- एक समीक्षा | Dr Reena | 29 |
| 9 | रेणापुरकर के काव्यों में सामाजिक दृष्टि | डॉ. अखिलेश अ. शर्मा | 34 |
| 10 | राष्ट्र उभारणीत युवकांची भूमिकाb | प्रा.डॉ.दयानंद माधवराव गुडेवार | 42 |
| 11 | स्वातंत्र्योत्तर ग्रामीण साहित्याची भूमिका व चळवळीचे स्वरूप चिंतन | प्रा. डॉ. उमेश भ. पुजारी | 47 |
| 12 | भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वाचे स्मरण | प्रा. डॉ. तुकाराम हापगुंडे | 51 |
| 13 | भारतीय राजकीय व्यवस्थेत राज्यपालांची भूमिका | प्रा.मंदे सचिन संभाजीराव | 55 |
| 14 | रंगनाथ पठारे यांच्या कथालेखनाची भाषाशैली | प्रा. केशव विठ्ठल कोकाटे | 57 |
| 15 | मानव अधिकार विषयक संवैधानिक तरतुदी - एक राजकीय विश्लेषण | डॉ.सुरेश रावसाहेब खिस्ते | 63 |
| 16 | निवडणूक आयोग भूमिका आणि आव्हाने | स.प्रा.सुळे महिपाल रामराव | 67 |
| 17 | भारतीय संविधान आणि मानवाधिकार | डॉ विकास चांदजकर | 71 |
| 18 | भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांचे विश्लेषणात्मक अध्ययन | प्रा. डॉ. रमेश शेवाळे | 73 |
| 19 | लोकप्रशासनातील ताण-तणाव व्यवस्थापन | शिवाजी धोंडीबा चांदणे | 78 |
| 20 | ७५ वर्षांतील 'संविधानाची उद्देशिका' एक आवलोकन | प्रा. डॉ. दयाराम द. मस्के | 87 |

B.Aadhar Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386- D
ISSN : 2278-9308
January, 2023

# भारतीय संविधान आणि मानवाधिकार

डॉ विकास चांदजकर
मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम
vikaschandajkar@gmail.com 9764294888

सारांश -भारतामध्ये मानवाधिकारांच्या अंमलबजावणीसाठी व संरक्षणासाठी घटनात्मक आणि वैधानिक उपाय करण्यात आले आहे. तसेच, अनेक स्वयंसेवी संस्थासुद्धा मानवाधिकार संरक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत आहे. घटनात्मक उपाय : व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास घटनेच्या 'कलम ३२' मध्ये घटनात्मक उपायांचा हक्क देण्यात आला आहे.

भारतीय राज्यघटनेचा सरनामा, मूलभूत हक्कांचा भाग तिसरा आणि राज्यांच्या धोरणविषयक मार्गदर्शक तत्वांचा भाग चौथा हा राज्यघटनेचा गाभा आहे. त्यांचा एकत्रित विचार केल्यास त्यामध्ये मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा, नागरी आणि राजकीय हक्क त्याचबरोबर आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा करारनामा यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते.

संविधानाची प्रस्तावना म्हणजेच उद्देशिका संविधानाची उद्दिष्टे स्पष्ट करते. यातील मूल्ये विचार व हेतू उदात्त आहेत. उद्देशिकेची सुरुवात 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांनी होते. सर्व भारतीयांनी उद्देशिकाद्वारे भारताचे एक सार्वभौम, समाजवादी धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडविण्याचा व संविधानातील मूल्ये संवर्धित करण्याचा निर्धार केला आहे. संविधानातील स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, बंधुता या मूल्यांची जोपासना करणे, एकमेकांचा सन्मान करणे, आदराने वागवणे अपेक्षित आहे. जेव्हा प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचा आदर करून स्वांतत्र्य व हक्कांचा सन्मान करणार तेव्हा व्यक्तिप्रतिष्ठा निर्माण होईल त्यातूनच बंधुभाव वाढीस लागेल. एकमेकांच्या सहकार्यातून समानतेकडून समरसतेकडे ही सामाजिक भावना प्रवाहित होत राहील.

भारतीय राज्यघटनेचा सरनामा, मूलभूत हक्कांचा भाग तिसरा आणि राज्यांच्या धोरणविषयक मार्गदर्शक तत्वांचा भाग चौथा हा राज्यघटनेचा गाभा आहे. त्यांचा एकत्रित विचार केल्यास त्यामध्ये मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा, नागरी आणि राजकीय हक्क त्याचबरोबर आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा करारनामा यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्ये नमूद करणारा भाग चार 'अ' महत्त्वाचा आहे; कारण, हक्क हे कर्तव्याशिवाय अपूर्ण असतात. आपल्या राज्यघटनेच्या शाश्वत संदेशाचे सार 'सर्व मानवजात जन्मत:च मुक्त आणि समान असते' हेच आहे.भारताने मानवी अधिकारांच्या जागतिक जाहीरनाम्याच्या निर्मितीमध्ये सक्रिय भाग घेतला होता. भारताने अनेक मूलभूत आंतरराष्ट्रीय मानवाधिकार करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

भारतामध्ये मानवाधिकारांच्या अंमलबजावणीसाठी व संरक्षणासाठी घटनात्मक आणि वैधानिक उपाय करण्यात आले आहे. तसेच, अनेक स्वयंसेवी संस्थासुद्धा मानवाधिकार संरक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत आहे.

घटनात्मक उपाय : व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास घटनेच्या 'कलम ३२' मध्ये घटनात्मक उपायांचा हक्क देण्यात आला आहे. उल्लंघन झालेले मूलभूत हक्क सर्वोच्च न्यायालयाकडून पुन्हा प्राप्त करून घेण्याचा हक्कदेखील मूलभूत हक्क म्हणून घटनेत नमूद करण्यात आला आहे.मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा (१९४८) पाठोपाठ १९६६मध्ये नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा आणि 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा' या करारांवर स्वाक्षरी करणाऱ्या राष्ट्रांना आपल्या राष्ट्रीय कायद्यामध्ये तरतुदी करून त्याची अंमलबजावणी करणे बंधनकारक ठरते.

मानवी हक्कांचा प्रसार, प्रचार आणि संरक्षण या हेतूने उपलब्ध साधनांच्या साहाय्याने जगभरात संयुक्त राष्ट्रसंघ आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संस्था कार्य करीत आहेत. यातूनच १९९१मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे पॅरिस येथे

झालेल्या विविध राष्ट्र संघटनांच्या बैठकीत 'पॅरिस तत्त्व' उद्यास आली. या तत्वांच्या आधारेच मानवी हक्क समर्थक संस्थांची स्थापना होऊन त्यांची कार्यपद्धती आखली जाते.वैधानिक उपाय : मानवी हक्कांच्या प्रभावी संरक्षणासाठी 'मानवी अधिकार संरक्षण कायदा १९९३'मध्ये संमत करण्यात आला. या कायद्यामध्ये राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, राज्य मानवाधिकार आयोग आणि मानवाधिकार न्यायालेय यांच्या स्थापनेची तरतूद करण्यात आली आहे.

राष्ट्रीय मानवी हक्क आयोग

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना १२ ऑक्टोबर १९९३ रोजी करण्यात आली. यामध्ये NHRCची रचना, नेमणूक कार्यकाळ, सचिवालय, कार्य व अधिकार, NHRC ची भूमिका इत्यादी संबंधीची माहिती अभ्यासणे आवश्यक आहे. याशिवाय राज्य मानवी हक्क आयोग (State Human Rights Commission) त्याची निर्मिती, नेमूणक, कार्यकाळ, कार्य इत्यादी, तसेच ६ मार्च २००१ ला स्थापन झालेला महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, याचबरोबर मानवाधिकार न्यायालये (Human Rights Courts) मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या संबंधित तक्रारी त्वरित सोडविल्या जाव्यात म्हणून या न्यायालयांच्या स्थापनेची तरतूद केली जाते. याशिवाय इतर आयोग जसे राष्ट्रीय महिला आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग, राष्ट्रीय मागासवर्ग आयोग, राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग इत्यादी आयोगामार्फत मानवी हक्कांचे संरक्षण व अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जातो.

भारतातील मानवी हक्क चळवळ

भारतामध्ये १९३६ साली स्थापन झालेली भारतीय नागरी स्वातंत्र्य संघटना (Indian civil Liberties Union) ही प्रसिद्ध मानवी हक्क संघटना पं. जवाहरलाल नेहरू यांच्या पुढाकाराने स्थापन झाली. 'शासनाला विरोध करण्याचा हक्क,' या हेतूने ही संघटना स्थापन केली गेली होती. तसेच, स्वातंत्र्यपूर्व सामाजिक रुढी, परंपरा, स्पृश-अस्पृश्यता इत्यादींसाठी झालेल्या जन आंदोलनाचा समावेशसुद्धा मानवी हक्कांच्या चळवळीमध्येच करता येतो. महात्मा गांधी, राजा राममोहन राय, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ईश्वरचंद्र विद्यासागर, धों. के. कर्वे इत्यादींनी अस्पृश्यता, सती, बालविवाह, हुंडा यांसारखे स्त्री हक्क, बालहक्क व मानवी हक्कांसाठीच विविध लढे उभारले होते. आज राष्ट्रीय व राज्य मानवी हक्क आयोगाबरोबर देशभरात २००हून अधिक गैरसरकारी (स्वयंसेवी) संस्था मानवाधिकाराच्या क्षेत्रात कार्य करतात. उदा. People's Union for civil Liberties, Citizens for Democracy, New Delhi इ. तर, आंतरराष्ट्रीय स्तरावर Human Rights watch, New York Amnesty International London, Asia watch New York Centre for Constitutional Rights, New york इ. संस्था कार्यरत आहेत.

YUVN (Youth Voluntary Action, Pune), इ. बालकांच्या हक्कांसाठी, तर, सहेली, साक्षी, चेतना अशा संस्था महिलांच्या हक्कासाठी कार्यरत आहेत.

संदर्भ

1.महाराष्ट्र टाइम्स, Date-18 Sept.2018
2. तरूण भारत , Date-25Nov.2022
3. तरूण भारत , Date-13 Aug.2022
4. समाज आणि मानवी हक्क, शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर ,2015
5. मानवाधिकार संरक्षण अधिनियम -1993,राष्ट्रीय मानवाधिकार आयोग 27 जुलै २०१९

132

One Day Interdisciplinary National Conference on

# 75 Years of Indian Independence

Organized by

**Department of Political Science (UG & PG)**

## Adarsh Mahavidyalaya, Hingoli

In Collaboration with

**Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded**

# CERTIFICATE

This is to certify that Prof./Dr./Shri./Smt. **डॉ. विकास घांदजकर** of **मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम** has participated / presented a paper entitled **भारतीय संविधान आणि मानवाधिकार** in One Day Interdisciplinary National Conference on **"75 Years of Indian Independence"** organized by Department of Political Science (UG & PG), Adarsh Education Society's Adarsh Mahavidyalaya, Hingoli, Maharashtra, in collaboration with Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded held on Tuesday, 24th January, 2023.

**Convener**
**Mr. G. P. Chavan**
(Dept. of Pol. Sci.)

**Chief Organizer**
**Dr. Vilas Aghav**
(I/C Principal)